आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता
८ मार्च २०२५ शनिवार

**ठळक बातम्या**

- जगभरासह राज्यात आज महिला दिन साजरा/हा दिवस महिलांच्या योगदानाचा दिवस असल्याचे राष्ट्रपतींचे गौरवोद्गार.

- विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, लखपती दिदी योजनेच्या लाभार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांचा संवाद.

- राज्यभरात महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन

**आणि**

- बुलडाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर अपघातात दोघांचा मृत्यू, दहा जण जखमी

**<><><><><>**

जागतिक महिला दिन आज सर्वत्र साजरा केला जात आहे. सर्व महिला आणि मुलींसाठी अधिकार, समान हक्क आणि सबलीकरण ही यंदाच्या महिला दिनाची संकल्पना आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस महिलांचं योगदान आणि कर्तबगारीचा गौरव करण्याचा असून महिलांच्या विकासाच्या प्रवासात सर्व देशवासीयांनी त्यांना साथ द्यावी, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे.

विकसित भारतासाठी महिलांच्या नेतृत्वाखालील विकास महत्वपूर्ण असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर महिला सक्षमीकरणासाठी केंद्र

सरकारनं अनेक योजना आणि धोरणं आखली आहेत, देशभरातल्या महिलांना आपण नमन करत आहोत असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. महिलांच्या जिद्दीला, धैर्याला आणि प्रत्येक क्षेत्रातल्या भरीव योगदानाला सलाम असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिला दिनाच्या निमित्तानं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नारी शक्ती से विकसित भारत या एक दिवसीय संमेलनाचं उदघाटन झालं. महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी महिला दिन साजरा केला जातो, या दिनाचं औचित्य साधून सर्वांनी लिंगभाव समानतेत सुधारणा घडवून आणण्याचा संकल्प करूया असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार विविध योजना राबवत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या….

**होल्ड बाईट राष्ट्रपती**

केंद्रीय महिला आणि बाल कल्याणमंत्री अन्नपूर्णा देवी या संमेलनात सहभागी झाल्या आहेत. या परिषदेनंतर उच्चस्तरीय पॅनेल चर्चा आणि तीन तांत्रिक सत्रं होणार आहेत.

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असणार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवसारीतल्या वंसी-बोरसी इथं प्रधानमंत्री मोदी, लखपती दीदी संमेलनाला

संबोधित करताना बोलत होते. या कार्यक्रमात एक लाख महिला उपस्थित होत्या.

नारी शक्तीने देशाच्या प्रगतीची कमान सांभाळली आहे. महिलांचा सन्मान ही समाज आणि देशाच्या विकासाची पहिली पायरी आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

आपल्या आयुष्यात कोट्यवधी माता-भगिनींचा आशीर्वाद मिळाला, हे आपलं भाग्य आहे. हे आशीर्वाद सर्वात मोठी प्रेरणा आहेत, असं मोदी यावेळी म्हणाले. लिज्जत पापड, अमूलसारख्या उद्योगातल्या, महिलांच्या सहभागाचं त्यांनी कौतुक केलं. स्वयं सहाय्यता गटाच्या सामर्थ्याला वाढवण्यासाठी सरकारनं या योजनेेचा निधी पाचपटींनी वाढवला, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

जागतिक महिला दिन राज्यात उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त धुळे जिल्ह्यात उत्कृष्ट काम करणार्या २१ महिला पोलीस अंमलदारांना कॉप ऑफ द मंथ पुरस्कारानं गौरवण्यात आलं. परभणी जिल्ह्यात दैठणा इथल्या जिल्हा परिषद केंद्रीय कन्या प्रशालेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तर गोंदियात सायकल संडे ग्रुपच्या महिलांनी शहरात सायकल रॅली काढली. या सायकल रॅलीत गृह पोलीस अधीक्षक आणि उप विभागीय महिला पोलीस अधिकारी तसंच तरुणींनी मोठ्या संख्येनं हजेरी लावली. अकोला शहरात वॉकेथॉनद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. धाराशिवमधे महिला दिनी योग प्रशिक्षण शिबिर घेण्यात आलं. योग शिकून महिलांनी निरोगी राहण्याच्या संदेश यावेळी देण्यात आला.

सांगलीमध्ये जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि महिला बालविकास विभागाच्या वतीनं महिला मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्यात महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

**<><><><><>**

जागतिक महिला दिनानिमित्त राज्याच्या मुख्य सचिव आणि या पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी सुजाता सौनिक यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. आपल्या संदेशात त्या म्हणाल्या,

**होल्ड… बाईट- सुजाता सौनिक**

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचं औचित्य साधून मध्य रेल्वेनं आज संपूर्ण महिला चमू असलेली एक विशेष गाडी चालवली. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून आज सकाळी ही वंदे भारत एक्सप्रेस शिर्डीच्या दिशेनं रवाना झाली. या गाडीत लोको पायलट, सहायक लोको पायलट, रेल्वेगाडी व्यवस्थापक, तिकीट तपासक, तसंच आहारसेवा पुरवणाऱ्या सर्व कर्मचारी महिला आहेत. विशेष बाब म्हणजे, संपूर्णरीत्या महिलांनी चालवलेलं भारतातलं पहिलं रेल्वेस्थानक असलेल्या माटुंगा स्थानकातून ही गाडी पुढे गेली. २०१७ पासून पूर्णपणे महिलांनी चालवलेल्या या स्थानकाची नोंद लिमका बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्येही झालेली आहे. संपूर्ण महिला चमूने चालवलेली ही वंदे भारत एक्सप्रेस ठरलेल्या वेळी शिर्डीला पोहोचली.

**<><><><><>**

मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावर आज सकाळी झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले आहेत. जखमींवर जालना

इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यवतमाळहून शिर्डीला जाणाऱ्या भाविकांच्या चारचाकीचं टायर फुटल्यानं ती कारला धडकली. यात दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

ऑनलाईन छळवणूक आणि सेक्सटॉर्शन पीडितांना मदत करण्याच्या उद्देशानं राज्याच्या सायबर विभागानं ब्रश ऑफ होप या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीनं सुरु केलेल्या हेल्पलाइनचा काल प्रारंभ झाला. या कार्यक्रमाला मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सायबर विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव आणि अभिनेते फरहान अख्तर उपस्थित होते. ०२२-६५३६ ६६६६ या हेल्पलाइन क्रमांकावरून पीडितांना तात्काळ समुपदेशन, कायदेशीर सल्ला, आपत्कालीन मदत दिली जाणार आहे.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक किल्ल्यांपैकी पन्हाळगड हा पहिला शिवकालीन पुनर्निर्मित किल्ला असेल. तसंच जागतिक वारसा स्थळ म्हणूनही पहिला किल्ला अशी ओळख निर्माण करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. पन्हाळा किल्ल्यावरील १३ डी थिएटरचं लोकार्पण आणि पन्हाळगडाचा रणसंग्राम या लघुपटाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. यासाठी आवश्यक निधी कमी पडू देणार नसल्याचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिलं.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, तसंच सहआरोपींची

नावं पुरवणी आरोपपत्रात समाविष्ट करावीत, या मागणीसाठी आज जिंतूर शहरात कडकडीत बंद पाळला गेला. तसंच नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिलं.

**<><><><><>**

जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद म्हणजे वेव्हज् मध्ये क्रिएट इन इंडिया चॅलेंज अंतर्गत  ट्रुथ टेल  हॅकेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याचा उद्देश, थेट प्रक्षेपणामध्ये दिल्या जाणाऱ्या चुकीच्या माहितीच्या समस्येवर मात करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करणं असा आहे.

**//<><><><><>//**